क्रमांकः पोअवा/आस्था./HC TO ASI/पदो.-१८/ 8034/२०१८,    वाशिम. दिनांक :- 1 SEP 2018

# आदेश

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.बीसीसी-२०१७/प्र.क्र.३१२-अ/१६-ब, दिनांक २९/१२/२०१७ च्या शासन निर्णयान्वये तुर्तास पदोन्नतीच्या कोटयातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून भरण्याबाबत आदेश दिले आहेत. त्यास अनुसरुन आरक्षण नसलेल्या खुल्या प्रवर्गातील तसेच इतर मागास वर्गीय प्रवर्गातील खालील नमुद "पोलीस हवालदार" यांना "सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक" पदावर वेतन बॅन्ड ५२००-२०२००/- ग्रेड पे-२८००/- मध्ये निव्वळ स्थानिक व तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्याचा Departmental Promotion Committee ने निर्णय घेतला आहे. खालील नमुद पोलीस हवालदार यांना Departmental Promotion Committee चे निर्णयानुसार त्यांना "पोलीस हवालदार" ते "सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक" पदावर पदोन्नती स्विकारल्याचे दिनांकापासून पदोन्नतीवर त्यांचे नावासमोर दर्शविल्या ठिकाणी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम | ब.नं. | कर्मचा-यांचे नांव | जात | प्रवर्ग | कोठून | कोठे | पदोन्नती समितीचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | HC | १८ | अरुण मधुकर काथळकर | माळी | इमाव | कारंजा शहर | कारंजा शहर | सेवाज्येष्ठता नुसार पात्र |
| २. | HC | ३१ | दुर्गादास हिरासिंग चव्हाण | बंजारा | विजा-अ | अमानी | कारंजा ग्रामीण | सेवाज्येष्ठता नुसार पात्र |
| ३. | HC | ३७४ | सुर्यकांत लहुराम शिरसाट | बौध्द | अजा | शवाशा | बॅक आर्डली पो.अ.कार्या | सेवाज्येष्ठता नुसार पात्र |
| ४. | HC | ५५९ | विजय गणपतराव मस्के | कुणबी / इमाव | खुला | जिवाशा | जिवाशा | सेवाज्येष्ठता नुसार पात्र |
| ५. | HC | ४९२ | नारायण गोविंद जाधव | मराठा | खुला | स्थागुशा | स्थागुशा | सेवाज्येष्ठता नुसार पात्र |
| ६. | HC | ४९९ | शकील खान सुजात खान पठाण | मुस्लिम | खुला | जउळका | जउळका | सेवाज्येष्ठता नुसार पात्र |
| ७. | HC | ११६० | भास्कर कुंडलिकराव राखोडे | माळी | इमाव | श्वान पथक | श्वान पथक | सेवाज्येष्ठता नुसार पात्र |
| ८. | HC | ९२ | विजय कनिराम राठोड | बंजारा | विजा-अ | धनज | धनज | सेवाज्येष्ठता नुसार पात्र |
| ९. | HC | १२१ | रमेश सदाशिव गावंडे | कुणबी | इमाव | धनज | धनज | सेवाज्येष्ठता नुसार पात्र |
| १०. | HC | ९३२ | रामेश्वर रामकृष्ण | मराठा | खुला | जउळका | जउळका | सेवाज्येष्ठता नुसार |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | कोल्हें | | | | | पात्र |
| ११. | HC | ९६७ | नारायण तुकाराम वाघ | मराठा | खुला | मालेगाव | मालेगाव | सेवाज्येष्ठता नुसार पात्र |
| १२. | HC | ७६३ | तारासिंग चतुरसिंग जाधव | बंजारा | विजा-अ | कारंजा शहर | कारंजा शहर | सेवाज्येष्ठता नुसार पात्र |
| १३. | HC | ४३९ | रमेश चंद्रभान तायडे | बौध्द | अजा | वाशिम शहर | वाशिम शहर | सेवाज्येष्ठता नुसार पात्र |
| १४. | HC | ७९२ | आत्माराम सवयाराम राठोड | बंजारा | विजा-अ | उपविपोअ. कार्या. वाशिम | उपविपोअ. कार्या. वाशिम | सेवाज्येष्ठता नुसार पात्र |
| १५. | HC | २३२ | दामोधर हरिभाउ डोलसे | मराठा | खुला | पो.मु. वाशिम | पो.मु. वाशिम | सेवाज्येष्ठता नुसार पात्र |
| १६. | HC | ४३७ | भगवान गणपत गावंडे | कुणबी | इमाव | स्थागुशा | स्थागुशा | सेवाज्येष्ठता नुसार पात्र |
| १७. | HC | ५४० | नंदकिशोर सुरेश परळकर | भावसार | इमाव | ॲक्ब्यु., वाशिम | ॲक्ब्यु., वाशिम | सेवाज्येष्ठता नुसार पात्र |
| १८. | HC | ५४६ | विष्णु भाऊसिंग आडे | बंजारा | विजा-अ | कारंजा शहर | कारंजा शहर | सेवाज्येष्ठता नुसार पात्र |

२/- वर नमूद केलेल्या तात्पुरत्या पदोन्नतीच्या आदेशाधिन असलेल्या पोलीस हवालदार यांचे विरुध्द आता गुन्हा दाखल झाला असेल / निलंबनाची कारवाई केली असेल / विभागीय चौकशी प्रलंबित असेल / सौम्य शिक्षेची अंमलबजावणी अद्याप सुरु झालेली नसेल / न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असेल, किंवा ते एखादी शिक्षा भोगत तसेच त्यांनी जाती दावा वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नसल्याचे निदर्शनास आल्यास नमुद पोलीस हवालदार यांना सदरची पदोन्नतीबाबत पुढील योग्यती कार्यवाही करण्यात येईल या अटीवर सदरची तात्पुरती पदोन्नती देण्यात येत आहे.

३/- सदरचे आदेश मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या अंतिम आदेशाच्या अधिन राहून व महाराष्ट्र शासनाच्या दिनांक २९/१२/२०१७ च्या शासन निर्णयाच्या अधिन राहून निर्गमित करण्यात येत आहे.

४/- तसेच वर नमुद पोलीस हवालदार यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांकःएसआरव्ही २०१५/प्र.क्र.३०३/का.१२, तारीखः १२.०९.२०१६ अन्वये जे कर्मचारी सदरची पदोन्नती नाकारणार आहेत, अशा कर्मचाऱ्यांना दोन वर्षापर्यंत त्यांना त्यांचे पदोन्नती करीता विचार करण्यात येणार नाही तसेच ज्या कर्मचा-यांने कायमस्त्ररुपाची पदोन्नती नाकारलेली आहे, त्यांचा पुढील कोणत्याही निवडसूचीकरिता विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

५/- ज्या पोलीस हवालदार यांना सदरची पदोन्नती स्विकारयाची नाही त्यांनी तसा विनंती अर्ज या कार्यालयास ७ दिवसाचे आंत प्रभारी अधिकारी यांचे मार्फतीने या कार्यालयास सादर करावा.

६/- वर नमुद पोलीस हवालदार यांना "सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक" पदावर पदोन्नती झाल्याबद्दल आमचे तर्फे अभिनंदन करण्यात येत आहे.

**( मोक्षदा पाटील )**
पोलीस अधीक्षक, वाशिम

प्रति,

सर्व ठाणेदार/सर्व संबंधित शाखा प्रभारी, वाशिम जिल्हा / राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय, वाशिम.

२/- संबंधित ठाणेदार यांनी सदर पदोन्नतीचे आदेश सर्व कर्मचारी यांचे समोर गणनेवर वाचुन दाखवावे. तसेच ज्या पोलीस हवालदारांनी पदोन्नती स्विकारलेली आहे. त्याबाबतची नोंद स्टेशन डायरी मध्ये करुन घेवून त्यांची पदोन्नती स्विकारल्याचा दिनांक व स्टे.डायरी च्या साना क्रमांकासह अहवाल उलट टपाली या कार्यालयास सादर करावा. व ज्या पोलीस हवालदार यांनी सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पदाची पदोन्नती स्विकारली नाही त्यांचा सुध्दा अहवाल उलट टपाली या कार्यालयास त्वरीत सादर करावा.

३/- उपरोक्त आदेशात नमूद केलेल्या ज्या पोलीस हवालदाराविरुध्द विभागीय चौकशी प्रलंबित आहे, अथवा विभागीय चौकशीत अथवा संक्षीप्त कारवाई मध्ये निर्गमित केलेल्या सौम्य शिक्षेची अंमलबजावणी अद्याप सुरु झालेली नाही, अशा पोलीस हवालदारकांकडून त्यांना भविष्यात होणारी शिक्षा पदोन्नतीच्या पदात भोगण्यास ते तयार नसतील अशा कर्मचाऱ्यांनी त्यांचे लेखी पूर्वसंमती विनंती अर्ज घेवुन या कार्यालयास सादर करावी जर सदर कर्मचारी यांनी आदेश प्राप्त झाल्यावर ७ दिवसाचे आत लेखी संमती सादर केले नाही तर त्यांना देण्यात आलेली शिक्षा ते पदोन्नतीचे पदात भोगण्यास तयार असतील असे समजण्यात येईल, या बाबत त्यांना लेखी समज देवुन त्याबाबतचा अहवाल उलट-टपाली या कार्यालयास सादर करावा.

४/- महाराष्ट्र शासन, शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांकःपीएवाय १०८२/सीआर-११००(एक)/एसईआर-३, दिनांक ०६, नोव्हेंबर, १९८४ अन्वये पदोन्नतीवर कनिष्ठ पदावर वेतनवाढ दिल्यानंतर वेतन निश्चिती करणेबाबत विकल्प द्यावयाचा असेल तर तो पदोन्नतीवर हजर झालेल्या दिनांकापासुन १(एक) महिन्याचे आंत द्यावा. व अशाप्रकारचा विकल्प न दिल्यास पदोन्नत पदावरील वेतन निश्चिती म.ना.से.(वेतन) नियम ११(१)(अ) अन्वये केली जाईल याची वर नमुद पोलीस कर्मचारी यांनी नोंद घ्यावी. त्यांना पदोन्नती नाकारवयाची असेल तर त्यांची सात दिवसाचे आंत प्रभारी अधिकारी यांचे मार्फतीने अर्ज या कार्यालयास सादर करावा.

प्रत माहितीस :-

पोलीस उपअधिक्षक(मुख्या.), वाशिम/उपविभागीय पोलीस अधिकारी/वाशिम/मंगरुळपीर/कारंजा, जि.-वाशिम /पोलीस उप-अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, वाशिम.

प्रत माहितीस व उचित कार्यवाहीस्तव रवाना :-

प्रमुख लिपीक लेखाशाखा/पत्रव्यवहार शाखा/वेतन लिपीक/विभागीय चौकशी लिपीक/आस्थालि.२ व ३/ डिपीजी लिपीक/ संगणक कक्ष पोलीस अधीक्षक, कार्यालय वाशिम.

२/- संगणक प्रमुख यांनी सदरचे आदेश त्वरीत पोलीस अधीक्षक, वाशिम यांचे **"संकेतस्थळावर"** सर्वाकरीता उपलब्ध करुन देण्या यावेत. तसेच सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी/सर्व ठाणेदार/सर्व शाखा/रापोनि.,पोलीस मुख्यालय, वाशिम यांचे संकेतस्थळावर **"ई-मेल"** द्वारे त्वरीत कळवावे.,

प्रत सस्नेह अग्रेषित :-

पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती.

<u>प्रत माहितीस्तव सविनय सादर :-</u>

मा.पोलीस उप-महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती.